


अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । सोमवार, दि. २२ एप्रिल २०२४ । वर्ष : २२ वे ▸ अंक : २०३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

**आजचा सामना**

राजस्थान रॉयल विरुद्ध मुंबई इंडियन्स

वेळ : रात्री ७.३० वा. स्थळ : जयपूर

# मौलवी घरोघर फिरताहेत, उर्दू पत्रके वाटताहेत!



## काँग्रेसला पाठिंबा देण्याचा मशिदीतून फतवा!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**मोदींचा पराभव करण्यासाठी सोलापुरात मौलवी घरोघर फिरत आहेत... उर्दू भाषेतील पत्रके घरोघरी वाटली जाऊ लागली आहेत... काँग्रेसला पाठींबा देण्याचे फतवे सोलापुरातील मशिदींमधून निघत आहेत...**

**मशिदीतील फतव्यांच्या आडून काँग्रेस संविधानाला खुलं आव्हान देण्याचं काम करतंय!**

**हे अतिशय गंभीर आरोप महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांनी केले आहेत.**

हिंदू मतांच्या ध्रुवीकरणाचा आरोप भारतीय जनता पक्षावर नेहमीच केला जातो. आता भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांने काँग्रेसवर चक्क 'मुस्लिम' मतांच्या ध्रुवीकरणाचा आरोप केलाय!

जिहादीना सोबत घेण्याची काँग्रेसची मानसीकता आहे; काँग्रेसला पाठींबा देण्याचा फतवा मशिदीमधून निघत आहे; त्यामुळेच एमआयएमने सोलापुरात उमेदवार दिलेला नाही; आता या फतव्या विरूद्ध सर्व समाज एकत्र होईल आणि संविधान वाचविण्यासाठी नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी उभा राहिल; लोकांनी एकत्रितपणे जिहादी वृत्तीचा सामना केला पाहिजे, असे सातपुते यावेळी म्हणाले.

जिहादी मानसीकतेचे उदाहरण देताना सातपुते यांनी हुबळीतील हिंदू युवतीच्या निर्घुण हत्येचा जाहीर निषेध नोंदवला; ते म्हणाले, हिंदू लिंगायत समाजातील नेहा हिरेमठ या युवतीला फैय्याज शेख नावाच्या तरूणाने प्रपोज केले होते, मात्र नेहाने नकार देताच जिहादी मानसीकतेच्या फैय्याजने नेहाची निर्घुण हत्या केली; कर्नाटकातील काँग्रेसचे सरकार जिहादीना पाठीशी घालण्याचे काम करत असल्याचा आरोपही सातपुते यांनी केला.

अक्कलकोट तालुक्यात अवकाळीमुळे शेतकऱ्यांचे खूप मोठे नुकसान झाले आहे, प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, अशी मागणीही सातपुते यांनी केली आहे.

### राम सातपुतेंचा गंभीर आरोप



### फैय्याजला फासावर लटकवा

जिहादींना पाठीशी घालण्याचे काम कर्नाटकातील काँग्रेसच्या सरकारने थांबवले पाहिजे. नेहा हिरेमठ हिच्या मारेकऱ्याला सरकारने ठेचून काढले पाहिजे. नेहाचा मारेकरी फैय्याज शेखला फासावर लटकवा, अशी आपली मागणी असल्याचे राम सातपुते म्हणाले.

# 'अकलूज पॅटर्न'ला शह देण्यासाठी शिंदे बंधूंचा 'माढा-करमाळा' पॅटर्न!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**मोहिते पाटील आणि उत्तम जानकर हे पारंपरिक शत्रु एकत्र आल्याने माळशिरस तालुक्यात राष्ट्रवादीला (तुतारी) मजबूत लीडचा 'अकलूज पॅटर्न' उपयुक्त टरणार असला तरी माढ्यातून या अकलूज पॅटर्नला शह देण्यासाठी आमदार बबनदादा शिंदे आणि आमदार संजयमामा शिंदे हे तितक्याच त्वेषाने 'माढा - करमाळा' पॅटर्न राबवणार आहेत. याच रणनीतीचा एक भाग म्हणून नरेंद्र मोदी यांची सभा माळशिरसमध्येच घेतली जाणार आहे.**



सोलापूर दौऱ्यावर आलेल्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या गाडीत आमदार बबनराव शिंदे यांना घेऊन माढा लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी त्यांच्यावर टाकली आहे. माढा लोकसभा मत दारसंघातील सध्या बबनराव शिंदे हे ज्येष्ठ आमदार आहेत. त्यांच्याकडे सर्व सूत्रे सोपवली आहेत. त्यांना त्यांचे बंधु करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे यांची ही साथ मिळत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून आमदार बबनराव शिंदे यांनी माढा विधानसभा मतदारसंघावर एक हाती वर्चस्व ठेवले आहे. आता आगामी काळात आमदार बबनराव शिंदे हे आपले चिरंजीव रणजितसिंह शिंदे यांना माढा विधानसभा मतदारसंघातून उतरवणारा आहेत. यासाठी त्यांना म हायुतीच्या घटक पक्षांची मदत लागणार आहे.

पण त्यासाठी बबनराव शिंदे यांना रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना जास्तीत जास्त मताधिक्य देणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांचे प्रयत्नही सुरू आहे. ज्याप्रमाणे मोहिते-पाटील माळशिरस तालुक्यातून एक हाती मताधिक्य घेणार अशी घोषणाबाजी करत आहेत तेवढ्याच ताकतीने आमदार बबनराव शिंदे व संजयमामा शिंदे यांना नाईक-निंबाळकरांना मताधिक्य द्यावे लागणार आहे.

करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे यांना आता बागल गटाची साथ मिळणार आहे. मागील लोकसभा निवडणुकीत करमाळा मतदारसंघातून संजय मामा शिंदे यांना ३२ हजारांचे मताधिक्य मिळाले होते. यावेळेस भाजपची ताकदही त्यांच्यासोबत असणार आहे. त्यामुळे यंदा करमाळा मतदारसंघातून भाजपच्या मताधिक्यात वाढ होईल असे महायुतीचे पदाधिकारी बोलत आहेत.

माणचे आमदार संजय गोरे, सांगोल्याचे माजी आमदार दीपक साळुंके, आमदार शहाजी पाटील, बागल बहिण-भाऊ आदी सगळेजण महायुतीचे उमेदवार खासदार नाईक-निंबाळकर यांच्या विजयासाठी कामाला लागले आहेत.

मोहिते-पाटील आणि शिंदे बंधू यांचे राजकीय वैर जिल्ह्याला परिचित आहेत. वर्चस्वातून या दोन्ही गटांमध्ये संघर्ष आहे. मोहिते -पाटील यांचे वाढते प्राबल्य शिंदे बंधुंसाठी आगामी राजकारणात अडचणीचे होऊ शकते. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत तसे होऊ द्यायचे नसल्यास शिंदे बंधु यांना निंबाळकर यांना निवडून आणावेच लागणार आहे.

संपूर्ण

### मोदींची सभा माळशिरसमध्येच होणार : नाईक निंबाळकर



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा माळशिरस इथेच ३० एप्रिल रोजी होणार आहे, पाच वर्षांपूर्वी ज्या ठिकाणी सभा झाली, ज्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशाच्या अनुषंगाने, तसंच राज्याच्या शिवाय माढा लोकसभेच्या मतदार संघासाठी जी आश्वासन दिली होती ती पूर्ण झालेली आहेत, असं खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी आज सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर, आजच माहिती मिळाल्याचे ते म्हणाले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची माढ्या ऐवजी माळशिरस मध्ये सभा घेऊन विरोधकांना कात्रजचा घाट दाखविला असे मानले जात आहे.

# पिढ्यान्‌पिढ्या दुष्काळात होरपळणारा सांगोला निंबाळकरांमुळे पाणीदार!

### आ. शहाजी पाटील यांचा दावा

✔ सांगोला/प्रतिनिधी

**सांगोला तालुका तसा केवळ सोलापूर जिल्ह्यातीलच नव्हे तर पश्चिम महाराष्ट्रातील कायम दुष्काळी जिल्हा. दुष्काळाची होरपळ ही इथली ओळख. पिढ्यानपिढ्या दुष्काळंलं गलितगात्र झालेल्या या तालुक्यात या पाच वर्षात अनेक सिंचन योजनांची कामे मार्गी लागली. टेंभू योजनेचं पाणी माण नदीत आणण्याची हा महत्वाकांक्षी या तालुक्यासाठी वरदायिनी ठरला. बाळासाहेब ठाकरे सिंचन योजनेसह अनेक सिंचनाच्या योजना मार्गी लागल्या. दरम्यान, या तालुक्यातील तब्बल ५५ वर्षांचा सिंचनाचा अनुशेष भरून निघाला.यासाठी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचा दावा सांगोल्याचे आमदार शहाजी पाटील यांनी केला.**

गेल्या पाच वर्षांत सांगोला विधानसभा मतदारसंघाचा खुंटलेला विकास मार्गी लावला असून शाश्वत विकास हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून विकासकामे सुरू आहेत. विकासाचा तसेच सिंचनाचा बॅकलॉग भरून काढत असताना सर्वसामान्य शेतकरी, जनतेच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देत पाण्याचा प्रश्न सोडवून हरितक्रांतीला चालना दिली आहे. रखडलेल्या विकासाला चालना देण्यासाठी गेल्या पाच वर्षात कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध केला आहे. तालुक्याचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी खा.रणजितसिंह निंबाळकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले, असं पाटील यांनी सांगितलं.

सांगोला मतदारसंघातील विकासाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठीच कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च झाला आहे. सर्वसामान्य शेतकरी, जनतेच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देत पाण्याचा प्रश्न सोडवून हरितक्रांतीला चालना दिली. सांगोला शहरातील ईदगाह मैदानासह मतदारसंघातील मुस्लिम समाजाच्या विकास कामांसाठी दहा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध केला आहे. सांगोला तालुक्याचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी तसेच इतर विकास कामे मार्गे लावण्यासाठी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनीही मोलाचे सहकार्य केले आहे. त्यामुळे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार खासदार रणजितसिंह निंबाळकर यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन आमदार शहाजी पाटील यांनी केले आहे.



### ३९ हजार एकर क्षेत्र ओलिताखाली

सांगोला तालुक्यातील वंचित १२ गावांसाठी वरदायिनी असलेली मात्र, जवळपास १७ वर्षापासून बासनात गुंडाळलेली सांगोला उपसा सिंचन योजनेला ऊर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे वारंवार पाठपुरावा केला. बहुप्रतिक्षित सादर योजनेचे स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना नामकरण करून तब्बल ८८३ कोटी रुपयांच्या खर्चाच्या योजनेला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असून या योजनेमुळे सुमारे ३९ हजार एकर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

### सांगोला तालुक्यात विकासाची गंगा

गेल्या ५५ वर्षात सांगोला विधानसभा मतदारसंघाचा अपेक्षेप्रमाणे विकास झालेला नाही. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा पाणीप्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता. पाच वर्षात टेंभू, म्हैसाळ, नीरा उजवा कालवा, स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना या सिंचन प्रकल्पांना कोट्यावधी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. मतदारसंघाचा सर्वांगीण विकास हेच मुख्य ध्येय आहे. मतदारसंघात रस्ते, पाणी प्रश्न, वीज पुरवठा यासह अनेक विकासकामे हाती घेतली आहेत तर अनेक कामे पूर्ण केली आहे. इंग्रजांच्या काळात बांधलेल्या शासकीय विश्रामगृह, तहसील कार्यालयाला निधी उपलब्ध करून नूतनीकरणासह सर्व शासकीय कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी प्रशासकीय इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे. खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या सहकार्यानं या पाच वर्षात ही विकासाची गंगा वाहती करता आली.